महाराष्ट्र शासन

# सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टे शन समोर, येरवडा पुणे

दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११ E-mail:-adobcpune@gmail.com

---

जा.क्र.ससं/इमाबक/भासशि/विजाभज-इमाव-विमाप्र/महाडीबीटी/२०२४-२५/१४८६ दि.२१/०८/२०२४

**प्रति,**
**मा. प्रादेशिक उपसंचालक,**
**इतर मागास बहुजन कल्याण,**
**(प्रादेशिक) विभाग पुणे**

**विषय :** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी प्रणालीद्वारे **इमाव प्रवर्गातील** मुलींना शिक्षण शुल्क परिक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणेचे अनुषंगाने मार्गदर्शन मिळणेबाबत.

**संदर्भ :** १. केंद्र शासन मार्गदर्शक सुचना सन १९९८
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडिल शासन निर्णय क्र.इमाव-२००२/प्र.क्र.४१४/मावक-३ दि.१२ मार्च २००७
३. केंद्र शासन मार्गदर्शक सुचना दि.०५.०५.२०२२
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडिल शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/ तांशि-४ दि.०८ जुलै २०२४

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता इत्यादी योजनेचे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील अर्ज भरण्याकरिता दि. २५.०७.२०२४ पासून https://mahadbtmahalt.gov.in या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयान्वये विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काबाबतच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या असून सदर सुचनांनुसार महाडीबीटी प्रणालीव्दारे प्राप्त होणा-या विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करण्यात येत असून शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे विविध शासन निर्णय / परिपत्रक यांचे देखील काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे.

तथापि संदर्भिय शासन निर्णय क्र.२ अन्वये शासन मान्यता प्राप्त विनाअनुदानित महाविद्यालयात व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शिक्षण घेत असलेल्या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, राज्यातील शासकीय व अनुदानित महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासन निर्णय दिनांक ०६/१०/२००३ अन्वये लागू केलेली शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क ही योजना सन २००६-०७ या वर्षापासून शासकीय दराने लागू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (बी.एड व डी.एड कोर्स वगळून) शासकीय कोटयातून सन २००६-२००७ या वर्षी

प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती करण्यास तसेच **इतर मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काच्या ५०% दराने प्रतिपूर्ती करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.**

तरी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे संदर्भिय शासन निर्णय क्र. ४ अन्वये राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यापैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, **इतर मागास प्रवर्गातील**, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) **मुलींना**, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व **इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून शासनाने मान्यता दिलेली आहे.**

परंतू संदर्भ क्र. ४ मधील शासन निर्णयातील मुद्दा क्र. ६ अन्वये **"संबंधित प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे त्यांच्या शासन निर्णयांमध्ये सुधारणा करावी. याव्यतिरिक्त योजनेच्या अन्य अटी-शर्ती व कार्यपध्दती कायम राहतील"** असे नमुद केलेले आहे. सबब विषयांकित प्रकरणी या कार्यालयास खालील मुद्यांबाबत संभ्रम निर्माण होत आहे -

१. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत महाडीबीटी पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणा-या विद्यार्थीनी यांचेकडून संबंधित महाविद्यालयांनी कोणते शुल्क प्रवेश प्रक्रीयेच्या वेळी भरून प्रवेश निश्चित करून द्यावा?

२. सदर विद्यार्थीनींना या विभागामार्फत देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या योजनांमध्ये ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यात येणार किंवा कसे?

३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या संदर्भ क्र. ४ मधील शासन निर्णयान्वये निर्गमित केलेले नियम, अटी व शर्ती व कार्यपध्दती या विभागास देखील अनुज्ञेय आहेत किंवा कसे?

तरी उपरोक्त मुद्दयांच्या अनुषंगाने मार्गदर्शन मिळावे ही विनंती जेणेकरून पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थीनींना देखील सदर लाभ मिळवून देणे सोईस्कर होईल.

**सोबत** - संदर्भ क्र.२ व ४ मधील शासन निर्णय

आपला विश्वासु,

(विशाल लोंढे)
सहाय्यक संचालक
इतर मागास बहुजन कल्याण पुणे

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर:-**

मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, म.रा पुणे